महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ४था मजला, प्रा. अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई–४०००५१ दूरध्वनी. २६४७४२११, २६४७२१३१

क्र.साप्रवि/१.ब/

# प्रशासकीय परिपत्रक क्रमांक ९४ दिनांक ३.०२.२००७

विषय: वार्षिक वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती थकबाकीबाबत.
संदर्भ: १) सा.आ.क्रमांक १६३/१६४ दिनांक: २.०६.२००५
२) सुधारपत्र क्रमांक ८४ दिनांक २.०६.२००५.

सामान्य आदेश क्रमांक १६३/१६४ दिनांक २.६.२००५ नुसार कंपनीचे अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक १.०४.२००३ पासून वेतनवाढ देण्यात आली व त्यानुसार वेतनातील फरक दिनांक १.०४.२००३ ते ३१.०८.२००४ पर्यंत देण्यात आलेला आहे. मात्र जे अधिकारी/कर्मचारी वार्षिक वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती घेतात त्यांना वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती थकबाकीबाबत त्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्याबाबतच्या सुचना देण्यात आलेल्या नाहीत.

त्या अनुषंगाने आता असे निर्देश देण्यात येत आहेत की, वार्षिक वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी वैद्यकीय भत्त्यापोटी दिनांक १.०४.२००३ ते ३१.०८.२००४ या १७ महिन्यांच्या कालावधीची प्रमाणशिर फरकाची थकबाकी कर्मचाऱ्यांचे वार्षिक वैद्यकीय प्रतिपूर्ती खात्यात जमा करून त्यानुसार वार्षिक वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके निकाली काढावीत.

(एस.वाय.पाटील)
मुख्य महाव्यवस्थापक(क)

प्रत सादर:

१) मुख्य कार्यालयातील सर्व खाते प्रमुख/विभाग प्रमुख.

२) क्षेत्रिय कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख.